REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४-
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख ११ डिसेंबर, १९४० | अंक ४९

"'उत्तर एकच' खरें असें तरि,
उत्तर अश्रुचें ऐकुनि ज्या परि,
अम्हीं जाणतों प्रभू कृपेनें,
लाभलीं अम्हां व्यस्त लोचनें,
हास्यासी तीं कारण होतीं,
तरी न तुम्हां पडो विस्मृती,
★ ★ ★
पडद्यावरच्या लीला अमुच्या,
गाजति कौशल्यानें ज्यांच्या,
दिग्दर्शक ते कला सिकंदर
स्फूर्तिशालि ते थोर-बहाद्दर."
तुमचे आवडते विनोदी नट



दामुअण्णा मालवणकर
नवयुग चित्रपट लि. च्या
लग्न पहावं करून
या बोलपटांत लौकरच पहा.
दिग्दर्शकः विनायक
संवाद-पटकथाः वि. स. खांडेकर,
छायालेखनः पांडुरंग नाईक.
प्रो. चिं. वि. जोशी लिखित
'चिमणराव' या भूमिकेवर आधारलेली कथा.
'पिअरलेस' प्रकाशन
न्यू वेस्ट एण्ड मुंबई
मध्यें लौकरच येणार.



मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
—मागविण्याचा पत्ता—
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
१२३ ए, सदाशिव, पुणें २.

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या
अशक्ततेवर
रक्तवर्धक
वापरा.
सर्वत्र मिळतें.
—: केंद्रें :—
पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.
आयुर्वेद रसशाळा पुणें, लि. पुणें ४.

## विविध माहिती

**ग्रेट ब्रिटनला सहाय करा**

" ग्रेट ब्रिटनला पैसे पाहिजे असल्यास, त्यास लागतील तेवढे द्यावेत. युद्ध लवकर समाप्त होण्यास त्याची मदत होईल. मागें आपण असें सहाय केलें होतें आणि तसें आताहि करूं या ", मि. हेनरी फोर्ड हे एका मुलाखतींत म्हणाले.

**बिनव्याजी रोख्यांची विक्री**

३ वर्षांच्या बिन व्याजाच्या डिफेन्स कर्जरोख्यांत ५७ लोकांनीं प्रत्येकी एक हजार रुपयांपेक्षा अधिक रकम गुंतविली आहे. ह्या ५७ पैकीं ३० लोक मुंबई विभागांतील आहेत.

**लॉटरी तिकिटांस मनाई**

हिंदुस्थानांतील पोर्चुगीज हद्दींतून ब्रिटिश हिंदुस्थानांत लॉटरी तिकिटें अगर लॉटरीसंबंधीं पत्रकें आणण्यास मध्यवर्ती सरकारनें मनाई केली आहे.

**वानरांच्या आयातीस बंदी**

ब्रिटिश हद्दींत वानरें आणण्यास हिंदुस्थान सरकारनें मनाई केली आहे.

**गुमास्ता कायदा**

मुंबई प्रांतांतील गुमास्ता कायद्याचे धर्तीवर सिंध सरकारनें कायदा करण्याचें ठरविलें असून तेथील विधिमंडळांत त्या संबंधांतील बिलाची चर्चा चालू आहे.

**९०० कोटि रुपयांच्या कर्जाची योजना**

अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला सुमारें ९०० कोटि रुपये द्यावे व त्यास तारण म्हणून ग्रेट ब्रिटननें अमेरिकेस ब्रिटिश साम्राज्यांतील सोन्याचें येत्या पांच वर्षांचें उत्पादन लावून द्यावें, अशी एक सूचना न्यूयॉर्कमधील बँकरनें केली आहे.

**चेकसची देवघेव**

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमध्यें २९ नोव्हेंबर अखेर संपलेल्या आठवड्यांत १३ कोटि, ३३ लक्ष रुपयांच्या १,०७,११३ चेकसची देवघेव झाली.

**कामाच्या उठावासाठी बँका बंद**

इंग्लंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड येथील बँकांचा व्यवहार १ जानेवारी रोजीं बंद ठेवण्यांत येणार आहे. तो दिवस वास्तविक सुटीचा नाहीं, परंतु बँकांस त्या दिवशीं विनाव्यत्यय काम करतां यावें, म्हणून त्यांचे दरवाजे बंद ठेवण्यांत येणार आहेत.

**सेव्हिंग्ज खात्यावर ½% व्याज**

मुंबई येथील नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्कनें आपल्या सेव्हिंग्ज खात्याचा व्याजाचा दर १ जानेवारी, १९४० पासून द. सा. द. शे. ½% केला आहे.

**पोलादाची बचत**

ज्या सार्वजनिक बांधकामांत पोलादाचा उपयोग करावा लागणार आहे अशीं सर्व कामें संयुक्त प्रांतांत बंद ठेवण्यांत आलीं आहेत. युद्धोपयोगी बांधकामें चालू राहातील. युद्धोपयोगी नसलेल्या परंतु आवश्यक अशा बांधकामासंबंधीं रिपोर्ट मागवून सरकार त्यासंबंधीं विचार करील.

**सर नेस वाडिया**

सर नेस वाडिया ह्यांनीं मुंबई डाइंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनीची ५० वर्षे सेवा केली आहे. गेलीं ३५ वर्षे ते त्या कंपनीचे अध्यक्ष आहेत.

**युद्ध कर्जरोखे**

नोव्हेंबर, १९४० अखेर ३४ कोटि, ६१ लक्ष रुपयांचे हिंदी युद्ध कर्जरोखे खपले आहेत. त्यांपैकीं २ कोटि, २११ लक्षांचे बिन व्याजाचे रोखे असून ३% डिफेन्स बाँडसमध्यें ३० कोटि, ८७ लक्ष रुपये आहेत. पो. ऑ. डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांत लोकांनीं १ कोटि, ५३ लक्ष रुपये गुंतविले आहेत.

**रेल्वेजची खरेदी**

बी. बी. अँड सी. आय. व आसाम बेंगॉल रेल्वे ह्या दोन रेल्वेज खरेदी करण्यासंबंधीचा हिंदुस्थान सरकारचा निर्णय लवकरच प्रसिद्ध होईल. स्टँडिंग फिनॅन्स कमिटीनें हा प्रश्न सेंट्रल ॲडव्हायसरी कौन्सिलकडे सोपविला होता. ह्या कौन्सिलच्या सभासदांत रेल्वेजच्या खरेदीसंबंधीं तीव्र मतभेद झाला.

**इंडियन मिलिटरी अॅकेडमीची प्रवेश परीक्षा**

इंडियन मिलिटरी अॅकेडमी, डेहराडून व रॉयल इंडियन नेव्ही ह्यांत उमेदवार घेण्याकरितां दिल्ली येथें परीक्षा घेण्यांत येईल, तिला २६ मार्च, १९४१ रोजीं प्रारंभ होईल. परीक्षेस बसूं इच्छिणारांनीं ६ जानेवारीपूर्वी अर्ज करावेत.

**हैद्राबाद संस्थानांत टेलिफोनचा प्रसार**

हैद्राबाद संस्थानांतील प्रमुख व्यापारी शहरें टेलिफोननीं जोडण्यांत येणार आहेत व त्यासाठी पांच वर्षांत २४ लक्ष रुपये खर्चण्यांत यावयाचे आहेत. ब्रिटिश हिंदुस्थानांतील टेलिफोनशीं हैद्राबाद लवकरच जोडण्यांत येईल.

**मि. चर्चिल ह्यांचा वाढदिवस**

मि. विन्स्टन चर्चिल ह्यांच्या ६६ व्या वाढदिवशीं ता. ३० नोव्हेंबर रोजीं त्यांस ब्रिटिश साम्राज्यांतील अनेक ठिकाणांहून अभिनंदनपर संदेश आले.

**ब्रिटिश परराष्ट्रीय व्यापार अखंड चालू आहे**

गेल्या वर्षांतील पहिल्या दहा महिन्यांतील ब्रिटिश आयात—निर्गतीच्या मानानें चालू वर्षांतील ब्रिटिश आयात—निर्गत बरीच वाढलेली आढळते. गेल्या वर्षांतील पहिल्या दहा महिन्यांपैकीं आठ महिने शांततेचे होते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

**तांदुळाची लागवड**

मुंबई प्रांतांत १९४०–४१ च्या मोसमांतील तांदुळाच्या लागवडीचा सरकारी अंदाज खालीलप्रमाणें आहे:—

| | एकर |
|---|---|
| ब्रिटिश मुलूख | १९,७०,००० |
| संस्थानी हद्द | ४,७२,००० |
| एकूण | २४,४२,००० |

गुजरातमध्यें गेल्या वर्षीच्या मानानें थोडी लागवड वाढली; इतरत्र ती कमी झाली.

**हिंद-ब्रह्मदेश व्यापारविषयक बोलणीं**

हिंदी मालास ब्रह्मदेशांत काय सवलती देतां येतील व ब्रह्मी मालास हिंदुस्थानांत काय सवलती देतां येतील, ह्यासंबंधीं वाटाघाटी करण्याकरितां ११ डिसेंबर रोजीं दोन्ही देशांच्या प्रतिनिधींची एक प्रास्ताविक बैठक भरणार आहे.

**१० लक्ष विळ्या व १ हजार टन कोळसा**

रेवाच्या महाराजांनीं परदेशस्थ हिंदी सैनिकांसाठी १० लक्ष विळ्या देण्याची तयारी दर्शविली आहे. आपल्या संस्थानहद्दींतील खाणींतील एक हजार टन कोळसाहि ते देणार आहेत.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ६१४ |
| २ इटलीच्या कमकुवतपणाचें प्रदर्शन ... ... | ६१५ |
| ३ देखरेख आणि तपासणी | ६१६ |
| ४ स्फुट-विचार (ब्रिटन-तुर्कस्तान व्यापारी करार—कॉफीची किंमत घटूं न देण्याचा प्रयत्न—किर्लोस्कर बंधु लि.—मि. बेव्हिन ह्यांची योजना—उमेदवारांची निवड) | ६१७ |
| ५ मुंबई प्रांतांतील शिक्षण प्रगति ... ... | ६१८ |
| ६ मुंबई प्रांतांतील पोलिस खात्याचा अहवाल | ६१८ |
| ७ फेडरल कोर्टाचे दोन निवाडे ... ... | ६१९ |
| ८ शेडयूल्ड बँकांची परिस्थिति | ६२० |
| ९ हिंदी चलनी नोटांची परिस्थिति ... | ६२० |
| १० शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा ... ... | ६२१ |
| ११ निवडक बाजारभाव | ६२२ |



# अर्थ

बुधवार, ता. ११ डिसेंबर, १९४०


## इटलीच्या कमकुवतपणाचें प्रदर्शन

जर्मनीच्या बाजूनें युद्धांत पडण्यांत आपण मोठा फायदेशीर सवदा करीत आहोंत आणि असें केल्यानें नवीन विजयाचें फळ विनायास आपल्या तोंडांत पडेल अशी मुसोलिनीची भ्रममूलक समजूत होती. हिटलरच्या पावलावर पाऊल टाकून आपण चाललों असतां जर्मनीसारखें इटलीहि मुलूख सहज जिंकूं शकेल अशी त्याची वेडी कल्पना होती. फ्रान्स हिटलरला शरण गेल्यावर हिटलर इंग्लंडवर स्वारी करील आणि भूमध्य समुद्रांत आपणांस मोकळें रान मिळेल असा मुसोलिनीचा अंदाज होता. म्हणून लिबियामधून इजिप्तवर स्वारी करण्याचा त्यानें घाट घातला आणि आपल्या सोमालीलँडमधून ब्रिटिशांनीं आपली फौज युद्धाच्या डावपेचांचा भाग म्हणून काढून घेतली तेव्हां त्याच्या तोंडास पाणी सुटलें. पण ब्रिटिश विमानदलाच्या पराक्रमामुळें इटालियन फौजांचें तेज पडेनासें झालें आणि त्यांची प्रगति आफ्रिकेमध्यें खुंटली. भूमध्य समुद्रांत इटलीच्या आरमारास तोंड बाहेर काढण्याची सोय राहिलेली नाहीं आणि त्याचीं बंदरेंहि सुरक्षित नाहींत. अशा स्थितींत सोपें सावज म्हणून मुसोलिनीनें ग्रीसवर स्वारी केली. परंतु तेथेंहि त्याच्या फौजांस कच खावी लागून पराक्रमी, ग्रीक सैन्याची चाल आल्बेनियांत सारखी चालू आहे. अशी रीतीनें मुसोलिनीच्या घमेंडखोरपणाचें हास्यास्पद प्रदर्शन झालें आहे. प्रतिस्पर्ध्यावर चालून जाण्याच्या मुसोलिनीच्या योजनेचा बोजवारा उडाला आहे इतकेंच नव्हे तर खुद्द इटालिअन देशाला स्वतःस सुरक्षितपणा उरलेला नाहीं.

मि. जॉर्ज स्लोकंब ह्या सुप्रसिद्ध वृत्तपत्रपंडितानें इटलीच्या ह्या परिस्थितीचें एका अलीकडील लेखांत उद्बोधक वर्णन केलें आहे. इटली ह्या देशाच्या संरक्षणाचा बंदोबस्त इतका कडेकोट आहे कीं त्याच्या पुढें ब्रिटिश आरमाराचें व विमानदलाचें कांहींही चालणार नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं एका इटालिअन पत्रानें नकाशा प्रसिद्ध केला आहे त्याचा उल्लेख करून ह्या समजुतीचा भ्रामकपणा मि. स्लोकंब ह्यांनीं निदर्शनास आणला आहे. इटलीचें चिलखत अभेद्य नसून त्यांतून चार नाजुक ठिकाणीं घाव करतां येण्यासारखें आहे असें त्यांचें म्हणणें आहे. घाव करण्याचें पहिलें साधन ब्रिटिश आरमार हें आहे. मुसोलिनीचीं लढाऊ जहाजें ब्रिटिश आरमारापुढें पलायन करण्यांत कशीं पटाइत आहेत, हें सिद्ध झालेंच आहे. इटलीच्या आफ्रिकेमधील प्रदेशास कुमक पोंचवणें ब्रिटिश आरमारानें अशक्य केलें आहे. ॲबिसिनियांत इटालिअनांची स्थिति असहाय झाली असून तेथील माजी बादशहास स्वदेश परत मिळवण्याची संधी प्राप्त होत आहे. समुद्राच्या मार्गानें होणारा इटलीचा व्यापार बंद पडला आहे हें त्या राष्ट्राच्या लष्करी तयारींत मोठें वैगुण्य आहे. एकूण क्षेत्रफळाच्या मानानें त्या देशाच्या किनाऱ्याची लांबी फार विस्तृत आहे आणि ह्या कारणानें त्याच्या संरक्षणाची सिद्धता अवघड होणें स्वाभाविक आहे. ह्या गोष्टीचा फायदा घेतला जाणें अगत्याचें आहे.

मुसोलिनीचा घमेंडखोरपणा व वावदूकपणा इटलीच्या विमानांचे संबंधांत चांगलाच निदर्शनास आला आहे. युद्धापूर्वी इटालिअन विमानदल ब्रिटिश व फ्रेंच विमानदलापेक्षा अधिक बलवान होतें. पण त्याची कार्यक्षमता आतां अगदींच घटली आहे आणि त्याचें सामर्थ्य लढाईच्या कसास उतरलें नाहीं. ब्रिटिश विमानें व वैमानिक ह्यांच्या मानानें इटलीचे वैमानिक दल अतिशय कमी दर्जाचें अनुभवानें ठरलें आहे. विमानांच्या हल्ल्यापासून बचाव करण्याची इटली व लिबिया ह्यांमधील व्यवस्था अगदींच सामान्य आहे. इटलीचे मुख्य कारखाने बहुतेक उत्तरेच्या भागांत असून लढाऊ विमानांचे हल्ले त्यांवर सहज होऊं शकतील अशी त्यांची स्थानिक परिस्थिति आहे. मिलन, जिनोआ व ट्यूरिन ह्या शहरांच्या आसपास विमानें व त्यांचीं इंजनें बनवण्याचे कारखाने आहेत. जिनोआ हें इटलीचें मोठें बंदर आहे आणि तेथें दारूगोळा व वीज तयार करण्याचे कारखाने आहेत. ब्रिटिश विमानांनीं त्यास भेट दिलीच आहे. इटलीच्या रेल्वेज आणि कारखाने पाण्याच्या जोरावर उत्पन्न केलेल्या विजेनें चालतात आणि आल्प्स पर्वतावरून येणाऱ्या पाण्याचा उपयोग ही वीज उत्पन्न करण्याकडे केला जातो. ह्या जलसंचयांचा नाश केल्यास इटालिअन कारखाने आणि रेल्वेज ह्यांचा सगळा प्रपंच आटोपेल. मुसोलिनीच्या सत्तेविरुद्ध वापरतां येण्यासारखें तिसरें शस्त्र म्हटलें म्हणजे अंतस्थ राज्यक्रांतीचें होय. इटलीमध्यें फॅसिस्टविरोधी पक्ष व गुप्त छापखाने आहेत आणि त्यांची चळवळ सारखी चालू असते. त्या लोकांस बाहेरून सहाय्य मिळाल्यास इटलींत अंतस्थ बंडाळी माजण्याचा संभव आहे आणि मुसोलिनीच्या सत्तेचा शेवट जवळ येईल. आरमार व विमानें ह्यांच्या आश्रयानें निवडक ब्रिटिश फौजा इटलींत शिरूं शकतील असेंहि मि. स्लोकंब ह्यांचें म्हणणें आहे. इटलीची युद्धपरिस्थिति व लढाऊ तयारी ह्यांचें निरीक्षण करून त्यांनीं ह्या राष्ट्राचा कमकुवतपणा स्पष्ट करून दाखवला आहे. इंग्लंडशीं वैर करण्याचें मुसोलिनीस वस्तुतः कांहीं कारण नव्हतें. हिटलरच्या मखलाशी प्रोत्साहनास बळी पडून स्वतःच्या संधिसाधूपणास उमटपणानें त्यानें सैल सोडलें. तो हिटलरच्या तावडींत चांगला सांपडला असून इटलीचें संरक्षण करण्यासहि तो असमर्थ आहे. ह्या परिस्थितीचा पूर्ण फायदा इंग्लंडनें घ्यावा अशी मि. स्लोकंब ह्यांची सूचना आहे. ब्रिटिश लढाऊ विमानें आज इटलीविरुद्ध चांगली कामगिरी बजावीत आहेत आणि ग्रीसला इंग्लंडचें हरतऱ्हेचें भरपूर सहाय मिळत आहे. भूमध्य समुद्राच्या पूर्व भागांत युद्धाच्या ज्वाळा पेटवून मुसोलिनीच्या करवीं इंग्लंडला शह धावयाचा हा हिटलरचा डाव इटलीच्या कमकुवतपणानें फसला आहे. सर्व रणक्षेत्रांत इंग्लंडचें लढाऊ सामर्थ्य सारखें वाढत आहे आणि जर्मनीच्या चढाऊ राजकारणास पायबंद बसला आहे.

## देखरेख आणि तपासणी

### देखरेखीची आवश्यकता कां भासते ?

( ले.:—वा. चिं. भानु )

सहकारी चळवळींत ' सुपरविजन ' देखरेख व तपासणी या बाबीला फार महत्त्वाचें स्थान, निदान हिंदुस्थानांत तरी आहे. या चळवळींत भाग घेणाऱ्या सर्वसामान्य जनतेंत जेथें जबाबदारीची जाणीव स्वाभाविकपणें किंवा सततच्या शिकवणुकीनें निर्माण झालेली असते, तेथें देखरेखीचें महत्त्व तितकेसें उरत नाहीं.

असें सांगतात कीं, इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, इत्यादि पुढारलेल्या देशांत सामान्य मजुरांना मिळणारी मजुरी ही आपल्या देशांतल्या तज्ज्ञ कामगारांना मिळणाऱ्या पगारापेक्षाहि जास्त असते, तरीहि त्या देशांतलीं कामें आपल्या देशापेक्षा कमी खर्चांत होतात. याचें मुख्य कारण असें कीं, त्या देशांत मजुरांवर देखरेख ठेवण्यास मुकादमीचा खर्च बिलकुल येत नाहीं. पण तेंच आपल्या देशांत दरेक १०-५ मजुरांवर देखरेख ठेवण्यास एक दोन मुकादम ठेवावे लागतात ! त्या देशांत मजुरी जास्त व कामाचे तास कमी असतांहि कामें विशेष सुबक आणि स्वस्त होतात तर आपले देशांत मजुरी अत्यंत अल्प व कामाचे तास पुष्कळ असतांहि कामें ओबडधोबड होऊन व महाग पडतात. याचें एकच कारण मजुरामध्येंच जबाबदारीची जाणीव नसते, येवढेंच नसून मजुरापासून वरपर्यंतच्या लहान मोठ्या देखरेखी अंमलदारांतहि ती जाणीव योग्य प्रमाणांत आढळून येत नाहीं; व म्हणूनच मुकादमावरहि देखरेखीच्या वरिष्ठ अंमलदारांचा घोळका नेमावा लागतो व तो फार खर्चाचा होतो. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत आपला मजूर कामावर राबतो पण ठरलेल्या वेळीं कामावर हजर न होणें, हजर झाल्यावरहि टेंगटिकोरी करीत वेळ गमावणें, हत्यारांची साफसफाई व धार लावणेमध्यें वेळ घालवणें, तंबाखू ओढण्यांत किंवा खाण्यांत वरचेवर गुंतून बसणें, कामें करितानाहि गप्पाटप्पा मारीत वेळेची भरती करणें व वेळ संपण्यापूर्वींच कामाची आवराआवर करणें यामुळें जरी कागदावर १२ तासाची कामगिरी नोंदली गेली तरी प्रत्यक्ष मन लावून केलेलें काम ४–५ तासापेक्षां जास्त होत नाहीं; आणि मजूरहि कामांत हुषार नसतात. केवळ सांगकामे. हा अनुभव नुसत्या खालच्या दर्जाच्या मजुराबद्दलच येतो असें नव्हे तर शेकड्यांनीं दरमहा पगार मिळणाऱ्या बौद्धिक कामगारांबद्दलहि येतो असें माहितगार लोक सांगतात तें खोटें आहे असें म्हणवत नाहीं. इतर देशांत एकाद्या मजुरावर काम सोंपविल्यानंतर व त्यांना कामाचे नकाशे व मांडणी समजून दिल्यानंतर त्याचेकडे पुनः पहाण्याची जरूरीच भासत नाहीं.

सारांश, देखरेखीचा खर्च कमी झाल्यास व लक्षपूर्वक कामाचा उठाव करण्याकडे मजुरांची प्रवृत्ति वाढल्यास त्यांची मजुरी सहज वाढवितां येईल व मग कामाचे तास कमी करणें किंवा मजुरांना इतर सुखसोयी उपलब्ध करून देणें मालकांना शक्य होईल. कदाचित् मग कायद्यानेंहि त्यांचेवर तसें बंधन आणणें राष्ट्रोपकारक होईल.

---

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# स्फुट विचार

## ब्रिटन-तुर्कस्तान व्यापारी करार

तुर्कस्तानचें प्रस्तुत युद्धांतलें धोरण स्वतंत्र व बाणेदारपणाचें आहे. त्या राष्ट्रास आपल्या जाळ्यांत गुंतवण्याचे प्रयत्न जर्मनीनें फॉन पेपन ह्या आपल्या वकिलामार्फत चालवले होते. बाल्कन राष्ट्रांमध्यें आपलें वर्चस्व स्थापून युद्धाचें क्षेत्र तुर्कस्तान व सीरिया ह्यांचेपर्यंत फैलावयाचें हा जर्मन राजकारणाचा डाव होता. एका बाजूस जर्मनी व इटली आणि दुसऱ्या बाजूस रशिया अशा पेचांत तुर्कस्तानला धरण्याचें हें हिटलरी धोरण होतें. पण तें निष्फळ करण्यांत तुर्की मुत्सद्यांनीं यश मिळवलें आहे, तें अभिनंदनीय आहे. हंगेरी आणि रुमानिया ह्यांस जर्मनीनें आपल्या कुटिल कारस्थानाच्या कक्षेंत ओढलें आहे. त्यांच्याशीं जर्मनीनें व्यापारी करार अशा रीतीनें केले आहेत कीं त्यांच्यामधील देवघेवींचा सर्व फायदा स्वतःस मिळावा आणि तीं राष्ट्रें आपणांवर कायमचीं अवलंबून रहावीं. ह्या धोरणाचा कावा वेळींच ओळखून तुर्कस्ताननें इंग्लंडशीं व्यापारी करार केला आहे आणि त्या अन्वयें पक्क्या-कच्च्या मालाची देवघेव ह्या दोन राष्ट्रांमध्यें विस्तृत प्रमाणावर होण्याचें ठरलें आहे. तुर्कस्तानला लागणारा पक्का माल इंग्लंड पुरवील आणि त्या देशाकडून कच्चा माल घेईल. ह्या व्यापारासाठीं लागणारें द्रव्य सहाय्य इंग्लंड तुर्कस्तानला देईल. जर्मनीशीं तुर्कस्तानचा होणारा निर्गत व्यापार आतां घटेल आणि त्यास युद्धसामुग्री मिळण्याचें बंद होईल. व्यापाराच्या साधनानें तुर्कस्तानला आपल्या कक्षेंत आणण्याचा हिटलरचा बेत ह्या रीतीनें साफ फसला आहे आणि जर्मनी व इटली ह्यांची पूर्व भूमध्य समुद्रांतली बाजू लंगडी पडली आहे. इकडे रणांगणावर इटलीची पीछेहाट चालली आहे, त्या पराभवांत ह्या आर्थिक पराभवाची भर पडली आहे, हें ब्रिटिशांची बाजू बळकट करण्यास सहाय्यक होणार आहे.

## कॉफीची किंमत घटूं न देण्याचा प्रयत्न

हिंदी कॉफीची परदेशची बाजारपेठ आतां बरीच कमी झाली असल्याकारणानें कॉफीचा बाजारभाव घटूं नये ह्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें १९४०-४१ च्या मोसमाकरितां एक प्रयोगात्मक योजना आंखली आहे. ह्या योजनेप्रमाणें २५ एकर त्यापेक्षा अधिक एकरांची ज्यांची कॉफीची लागवड आहे, अशांची नोंद केली जाईल. अशा प्रत्येक एस्टेटीच्या पिकाचे दोन भाग केले जातील:- कांहीं पीक अंतर्गत उठावासाठीं व कांहीं पीक जादा साठवणीसाठीं. कोणत्या प्रमाणांत ही वांटणी करावयाची, हें इंडियन कॉफी मार्केट एक्सपान्शन बोर्ड ठरवील. सर्व एस्टेटींस एकच प्रमाण लागू केलें जाईल. निर्गतीवर जी पट्टी आहे, तितकीच पट्टी अंतर्गत उठावावरहि घेण्यांत येईल. जादा साठवणींतील कॉफीच्या निर्गतीसाठीं बोर्ड शक्य तो यत्न करील. बोर्डामार्फतच फक्त निर्गत करतां येईल. किमान घाऊक दर निश्चित करण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारास आहे. वरील योजना एका ऑर्डिनन्सचे द्वारां हिंदुस्थान सरकार लवकरच जाहीर करील. ज्या संस्थानांचा कॉफीच्या लागवडीशीं संबंध येतो, अशा संस्थानांतहि योग्य ते कायदे करावे लागतील.

## किर्लोस्कर बंधु लि.

वरील कंपनीस ३१ जुलै १९४० अखेर संपलेल्या वर्षी १,३५,८७१ रु. १३ आ. २ पै. इतका नफा झाला. ५५,८९७ रुपये इमारती, मशिनरी वगैरेवरील घसारा काढून व ५,७३९ रुपये बुडींत येणें कमी करूनच ही नफ्याची रकम आलेली आहे. ह्या नफ्यांतून भागीदारांस ६% डिव्हिडंड देण्याकडे ७५ हजार रुपये खर्च करावे, सुमारें १२ हजार रुपयांची कामगारांच्या प्रॉव्हिडंट फंडास देणगी द्यावी, १० हजारांची संशयित व बुडीत बाकीसाठीं तरतूद करावी, १० हजार रुपये रिझर्व्ह फंडांत टाकावे, २३ हजार रुपये नोकरांस बोनस द्यावा व ५½ हजार रुपये बाजारभावाचे चढउताराकरितां रिझर्व्ह ठेवावे, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. "लढाईमुळें कच्च्या मालाचे भाव विलक्षण रीतीनें बदलत आहेत त्यास तोंड देतां यावें म्हणून" एक नवीन रिझर्व्ह निर्माण करण्याचें बोर्डाचें धोरण योग्य व इष्ट असेंच आहे. गेल्या वर्षी कंपनीस ६४,०७२ रुपये नफा झाला होता व त्यांतून ४% दरानें डिव्हिडंड देण्यांत आलें होतें. अहवालाचे सालीं कंपनीस त्या मानानें पुष्कळच चांगला नफा उरला. नफ्यांतून फंड निर्माण करण्याच्या कंपनीच्या सतत धोरणामुळें ताळेबंदाची मजबुती सालोसाल वाढत आहे. बदलत्या परिस्थितीस अनुसरून आपलें उत्पादन सुधारण्याचें व नवीन नवीन तऱ्हेचा माल काढण्याचें कंपनीचें धोरण आहे व त्यापासून भागीदारास सालोसाल अधिकाधिक नफा मिळूं लागेल असा भरवसा वाटतो. कांहीं वर्षांपूर्वी जे धंदे आपल्या धंद्यांशीं अगदीं विसंगत असे वाटत असत तेच धंदे कंपनीची सर्वांगीण व नैसर्गिक वाढ होण्याकरितां अगदीं सुसंगत व आवश्यक असें आतां ठरूं लागलें आहे. शेतकीचीं औतें करणाऱ्या कंपनीस निरनिराळ्या तऱ्हेची यंत्रसामुग्री करण्याची पाळी येईल व त्यांत ती यशस्वी होईल असें कांहीं वर्षांपूर्वी स्वप्नांतहि आलें नसेल. चालू काळाला अनुसरून किर्लोस्कर बंधू लि. नें आपलें कार्यक्षेत्र वाढवलें आहे व त्यांत त्यांस सुयश प्राप्त होत आहे. ह्यासाठीं डायरेक्टरबोर्डानें कंपनीच्या मेमोरँडममध्यें हेतूंचे कलमांत सुधारणा सुचविल्या आहेत. किर्लोस्कर बंधू लि. चा सतत उत्कर्ष होत जावो, असें आम्हीं इच्छितों.

## मि. बेव्हिन ह्यांची योजना : उमेदवारांची निवड

हिंदुस्थानांतील कित्येक कामगारांस ग्रेट ब्रिटनमध्यें नेऊन त्यांस तेथील लोकांबरोबर रहाण्याची व काम करण्याची संधि देण्याची ब्रिटिश मजूर-मंत्रि, मि. बेव्हिन ह्यांची योजना आहे. हिंदी कामगारांस त्यामुळें तेथील मजूर संघ व तत्सम संस्था ह्यांच्या कार्याची माहिती होईल.

ह्या योजनेस अनुसरून खालीलप्रमाणें उमेदवार घेण्यांत यावयाचे आहेत:—

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई: | १८ | बंगाल: | १८ |
| मद्रास: | १८ | संयुक्त प्रांत: | १६ |
| पंजाब: | १२ | बिहार: | १० |

मध्यप्रांत: ८

उमेदवारांची पहिली तुकडी ५० ची असून ती जानेवारी, १९४१ मध्यें येथून ग्रेट ब्रिटनकडे जाण्यासाठीं निघेल. ह्या उमेदवारांस सर्व सामुग्री दिली जाईल, जेथून आगबोटींत बसावयाचें तेथपर्यंतचें इंटरचें भाडें मिळेल, प्रवासांत रोज १ रु. भत्ता मिळेल व आगबोटींतील प्रवासाचे मुदतींत दरमहा २० रुपये खर्चासाठीं मिळतील. ग्रेट ब्रिटनमध्यें उमेदवारीचे काळांत त्यांस रहाण्याचा व जेवणाचा खर्च मिळेल व खर्चास दर आठवड्यास ८ शिलिंग दिले जातील. उमेदवारांची निवड विशेषतः इंजिनिअरिंगचे धंद्यांतील लोकांतून केली जाईल.

## मुंबई प्रांतांतील शिक्षणप्रगति

| | १९३८–३९ | १९३९–४० |
|---|---|---|
| शिक्षण–संस्था | १८,७२९ | २२,३२२ |
| त्यांतील विद्यार्थी | १५,६९,४४१ | १७,८२,६७२ |
| संस्थांतील मुलग्यांचें एकूण पुरुष-वस्तीशीं प्रमाण % | १२·७० | १४·३० |
| मुलींचें स्त्रीसंख्येशीं प्रमाण % | ४·४८ | ५·२५ |
| शिक्षणावरील प्रत्यक्ष खर्च (रु.) | ३ कोटी, ६१ लक्ष | ३ कोटी, ८२ लक्ष |
| शिक्षणावरील अप्रत्यक्ष खर्च (रु.) | ५९ लक्ष | ५६ लक्ष |
| मॅट्रिकचे परीक्षेस बसलेले विद्यार्थी | १४,०८७ | १५,५०४ |
| आर्ट्स कॉलेजांतील विद्यार्थी | ११,७९८ | १२,५८४ |
| त्यापैकीं स्त्रीविद्यार्थी | १,४९७ | १,९७४ |
| व्यवसायात्मक कॉलेजांतील विद्यार्थी | ४,४०३ | ५,०८७ |
| औद्योगिक शिक्षणसंस्था | ७३ | ८७ |
| त्यांतील विद्यार्थी | ५,०४९ | ५,८४३ |
| त्यांवरील खर्च (रु.) | ६,९६,३१३ | ८,०८,५९५ |
| हायस्कुलें व मिडल स्कुलें | ७३० | ७९० |
| मुलग्यांच्या प्राथमिक शाळा | १४,८७१ | १७,४९७ |
| त्यांतील विद्यार्थी | ११,२९,८३६ | १२,८६,६१२ |
| मुलींच्या प्राथमिक शाळा | १,५६४ | १,६१८ |
| त्यांतील विद्यार्थी | १,९२,८२२ | २,१३,८४४ |
| सर्व प्राथमिक शाळांतील विद्यार्थिनी | ३,३६,७१० | ३,९४,९६८ |
| प्राथमिक शाळांवरील प्रत्यक्ष खर्च (रु.) | १ कोटि, ९२ लक्ष | २ कोटि |
| शिक्षण घेत असलेले मुसलमान | १,८८,२२२ | २,१०,७८१ |
| आर्ट्स कॉलेजांतील मुसलमान विद्यार्थी | ४९७ | ५७७ |
| इंटरमीजिएट वर्गाचे एकूण विद्यार्थी | ७,१९,५२८ | ८,३३,९९७ |
| बॅकवर्ड वर्गांचे एकूण विद्यार्थी | १,९५,३०६ | २,४०,२८० |

मुंबई प्रांतांतील २१,६८८ गांवांपैकीं १३,३५८ गांवांत शाळा आहेत. सरासरीनें प्रत्येक ५·८ चौरस मैलांत शाळा असलेलें एक गांव आढळतें. शिक्षणावर झालेल्या एकूण खर्चापैकीं १९३९-४० मध्यें ४४·९% खर्च सरकारनें केला, १५·९% खर्च बोर्डांवर पडला, २७·४% खर्च फीचे वसुलांतून झाला व ११·८% खर्चाची तरतूद अन्य मार्गानें झाली. वैयक्तिक कॉलेजांचा खर्च वगळून परंतु युनिव्हर्सिटीच्या दोन्ही खात्यांचा खर्च धरून मुंबई विश्वविद्यालयाचा एकूण खर्च १४ लक्ष रुपये झाला. येरवडा येथील सरकारी रेफर्मेटरी शाळेंत ९४१ विद्यार्थी आहेत. दुसऱ्या दोन खासगी संस्थांनीं चालविलेल्या रेफर्मेटरी शाळांत मिळून ७५४ विद्यार्थी आहेत.

---

### दरमहा २०० रुपयांचा स्वार्थत्याग

युद्धकार्यास सहाय म्हणून पंजाब प्रांताच्या मंत्र्यांनीं आपल्या पगारांतून दरमहा २०० रुपये देण्याचें ठरविलें आहे.

---

## मुंबई प्रांतांतील पोलीस खात्याचा अहवाल
### ( १९३९ )

गुन्ह्यांचें प्रमाण वाढलें आहे. सर्वत्र वर्षभर येथें नाहीं तर तेथें कामगारांमध्यें थोडाफार असंतोष होता. मुंबई उपनगर जिल्ह्यांत सर्व जिल्ह्यांपेक्षां गुन्ह्यांचें प्रमाण अधिक होतें. रत्नागिरीचा अनुक्रम नेहमींप्रमाणें सर्वांत खालीं राहिला. एकूण १८,४४१ फौजदारी खटल्यांपैकीं १७,२७७ खटल्यांत आरोपींस शिक्षा झाल्या. पोलिसांनीं एकूण ३६,३२६ लोकांस अटक केली. एकूण १० लक्ष, ८० हजार रुपये किंमतीचा माल चोरला गेला. सापडलेल्या मालाचें चोरीस गेलेल्या मालाशीं प्रमाण ३०·८६% पडलें. पोलिसांनीं एकूण २,०७,९६८ वॉरंटें व समन्सें बजावलीं, ९०९ आगी विझविल्या, ६६,००९ कुत्रीं मारलीं, १२१९ आत्महत्यांची चौकशी केली व लष्करांतून पळून गेलेल्या १६ सैनिकांस पकडलें. रेल्वे पोलीस व कारकुनांचा वगैरे खर्च धरून मुंबई प्रांतानें १९३९–४० मध्यें पोलीस खात्यावर ९९ लक्ष,२३ हजार रुपये खर्च केला. दर पोलिसागणिक सरासरी खर्च ५१८ रु. १० आ. १० पै पडला. प्रत्येक ४·५१ चौरस मैलांस एक पोलीस, २·२८ रेल्वे मैलांस १ पोलीस व ९२४ लोकसंख्येस १ पोलीस असें प्रमाण पडलें.

पोलिसांच्या कार्यक्षमतेवर जनतेच्या वर्तनाचा काय परिणाम झाला, ह्याचें वर्णन अहवालांत खालीलप्रमाणें करण्यांत आलें आहे:—

“लोकसत्तात्मक राज्यकारभारानें पोलिसांवरील दाब वाढविला. लोकांनीं एकदम थेट सरकारकडे अनेक तक्रारी करण्यास प्रारंभ केला, त्यांतील कांहीं तक्रारी अगदीं क्षुद्र स्वरूपाच्या होत्या. लोकांनीं पोलिसांवर नियंत्रण ठेवलें पाहिजे ह्या भावनेनें व अननुभवानें त्यांतील कित्येक तक्रारी करण्यांत आलेल्या होत्या. पोलिसांमार्फत चौकशी चालू असलेल्या प्रकरणाशीं ज्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध होता, अशांपैकीं कांहींनीं स्वतःच्या फायद्याकरितां पोलिसांविरुद्धच तक्रारी केल्या. चौकशीअंतीं त्यांतील बहुतेक तक्रारी खोट्या अथवा विपर्यस्त स्वरूपाच्या असलेल्या आढळल्या. तक्रारी अर्जांचा व चौकशांचा पोलिसांचे कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होणें स्वाभाविक होतें. पोलिस अधिकाऱ्यांनीं फ़ाजील काटेकोरपणा दाखविण्यास प्रारंभ केला, ह्याचें कारण त्यांनीं केलेल्या निरुपद्रवी गोष्टींसहि विपर्यस्त स्वरूप दिलें जाऊन, खोट्या अथवा अशाच्या सत्य गंभीर आळांस उत्तर देण्याची पाळी आपणांवर येऊं नये, असें त्यांस वाटूं लागलें. खात्यांमार्फतच्या वरिष्ठांकरवीं करण्यांत येणाऱ्या चौकशांमुळें वेळ निष्कारण खर्ची पडूं लागला व गुन्हा उघडकीस आणण्याचे कामांतील कार्यक्षमता कमी झाली. स्थानिक राजकीय पुढाऱ्यांनीं कामांत आणलेला व्यत्यय–कितीहि सद्हेतूचा तो असो–हाहि त्यास कारणीभूत झाला.”

---

### फळांची आयात बंद

ग्रेट ब्रिटनमध्यें मारिंगासेरीज बाकी सर्व फळांची आयात बंद करण्यांत येणार आहे. युद्धास आवश्यक असणाऱ्या मालास आगबोटींत अगोदर जागा मिळणें आवश्यक आहे व त्यासाठीच वरील निर्बंध घातला आहे.

### फ्रान्सच्या राजधानीचें स्थलांतर

फ्रान्सच्या राजधानीचें व्हर्साइ येथें स्थलांतर करण्यांत येत आहे.

## फेडरल कोर्टाचे दोन निवाडे

### मद्रास सरकारचा शेतकरी कर्ज-निवारणाचा कायदा

वरील कायद्यानें मध्यवर्ती सरकारच्या अधिकारावर आक्रमण केलें आहे, सबब तो गैरलागू आहे, अशा अर्थाचें एक अपील हिंदी फेडरल कोर्टापुढे आलें होतें, तें त्या कोर्टानें बहुमतानें नामंजूर केलें. सर न्यायाधीश सर मॉरिस ग्वायर हे आपल्या निकालपत्रांत लिहितातः—

"प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांच्या कायद्यांकडून एकमेकांच्या अधिकारांचें मधून मधून आक्रमण होणें स्वाभाविक आहे, कारण अधिकारक्षेत्राची सीमा इतकी मिळलेली आहे, कीं कोणता विषय कोणाच्या अधिकारक्षेत्रांत येतो, हें ठरविणें अनेक प्रसंगीं अतिशय अवघड होतें. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स् व प्रॉमिसरी नोटा हे विषय मध्यवर्ती सरकाराचे कक्षेतील आहेत, त्यांच्याशीं मद्रास सरकारच्या कायद्याचा संबंध पोचूं शकत नाहीं, असें माझें मत आहे. समजा, ज्यां ज्यांस सावकारांनीं कर्जें दिलीं, तीं सिद्ध करणारीं कागदपत्रें वेगळ्या स्वरूपांत केलीं, तर त्यांच्या बदलत्या पद्धतींवर कायद्याचा कायदेशीरपणा अगर बेकायदेशीरपणा कसा अवलंबून राहूं शकेल? जरी सबंध कायदा गैरलागू नसला, तरी त्यांतील प्रॉमिसरी नोटांसंबंधींचीं कलमें तर गैरलागू ठरविण्यांत यावी, असा प्रश्न मांडण्यांत आला आहे. परंतु ज्या देण्या-घेण्यास नवीन कायदा लागू होणार, तीं देणीं घेणीं कायद्याच्या अंमलबजावणीच्या आधींच्या कोर्टाच्या डिक्रींनीं सिद्ध केलेली आहेत, तेव्हां प्रॉमिसरी नोटांसंबंधींचा भाग गैरलागू ठरविणें शक्य नाहीं."

सर वरदाचारिअर ह्यांनीं सर न्यायाधीशांप्रमाणेंच आपलें मत व्यक्त केलें. सर शहा सुलेमान ह्यांनीं मात्र विरुद्ध मत दिलें. "फेडरल बाबींवर प्रांतिक सरकारनें आक्रमण केलें नाहीं, असें म्हणतां येणें अशक्य आहे. प्रॉमिसरी नोटांसंबंधींच्या हिंदी कायद्यास मद्रास सरकारचा कायदा बाधक होत आहे. अपील मी मान्य करतों. सब जज्जाची ऑर्डर रद्द करावी, अशी सूचना करून हें प्रकरण मी हायकोर्टाकडे परत पाठवितो."

दोन न्यायाधिशांनीं अपील रद्द करावें असा निकाल दिला व एका न्यायाधीशानें तें अपील मान्य केलें. अर्थात, बहुमताप्रमाणें निवाडा झाला.

### (२)

### संयुक्तप्रांताचा खंडविषयक कायदा

खंडविषयक संयुक्त प्रांताचा कायदा प्रांतिक सरकारचे कक्षेंतीलच आहे, असा फेडरल कोर्टानें एकमतानें निवाडा केला. अलाहाबाद हायकोर्टानें हा कायदा प्रांतिक सरकारास करतां येत नाहीं, असा निकाल दिला होता, त्यावर संयुक्त प्रांत सरकारनें फेडरल कोर्टाकडे अपील केलें होतें. सर मॉरिस ग्वायर, सर न्यायाधीश, हे आपल्या निकालपत्रांत म्हणाले:—

"हिंदी विधिमंडळाचे अधिकार ब्रिटिश पार्लमेंटाप्रमाणेंच विस्तृत आहेत. त्यांस गतकालास लागू पडणारे कायदे पास करतां येत नाहींत असें म्हणणारानें ती गोष्ट सिद्ध केली पाहिजे. १९३७ सालीं शेतीच्या मालाचे बाजारभाव घसरले व त्यामुळें जमीनदारांस द्यावयाचा खंड कुळें देणार नाहींत अशी परिस्थिति संयुक्त प्रांतांत उपस्थित झाली. ह्या बिकट समयीं प्रांतिक सरकारनें स्वीकारलेलें धोरण जबाबदारीपूर्ण धाडसाचें होतें. खंड कमी करण्याची पद्धतशीर योजना त्यानें आंखली व त्यास अनुसरून जमीन महसूलहि कमी करण्याची व्यवस्था केली. त्यावेळची परिस्थिति अत्यंत भयंकर स्वरुपाची व सार्वजनिक शांततेस बाध आणणारी होती, आणि त्यास तोंड देण्यास सरकारजवळ पुरेसे अधिकार नव्हते. अशा वेळीं सरकार थोडी जोखीम स्वीकारून व प्रसंगविशेषीं आपल्या अधिकाराबाहेर वागूनहि वेळ मागवितें व हें करणें क्रमप्राप्त व योग्य होतें अशी विधिमंडळाची खात्री झाली, म्हणजे तें मंडळ त्यास मान्यताहि देतें. प्रांतिक सरकारनें स्वीकारलेल्या धोरणावर बरीच टीका झाली, तरी बहुसंख्य जमीनदार सरकारास मदत करण्यास तयार होते, ही गोष्ट येथें नमूद केली पाहिजे, कारण, ज्यांवर राज्यकारभाराची जबाबदारी आहे अशांनीं आणीबाणीचे प्रसंगीं सद्बुद्धीनें केलेल्या गोष्टींवर न्यायमंदिरांनीं कडक टीका करणें वाजवी होत नाहीं. प्रांतिक सरकारनें खंड कमी करण्याचें धोरण स्वीकारलें त्यास मागाहून संमति देणाऱ्या १९३८ च्या संयुक्त प्रांताच्या कायद्यानें हिंदी राज्यघटनेच्या २९२ व्या कलमाचा भंग केलेला नाहीं. ज्या बाबी पूर्णपणें कायदेशीर नाहींत किंवा ज्यांच्या कायदेशीरपणाविषयीं संशय आहे, अशा मागाहून कायदा करून कायदेशीर करून घेण्याचा अधिकार प्रत्येक विधिमंडळास आहे. हिंदी घटना कायद्यांत ह्या अधिकाराचा स्पष्ट उल्लेख आलेला नसला, तरी तो गृहीतच धरला पाहिजे. खंड कमी करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास आहे व तत्संबंधीं कायदा हा पूर्णपणें कायदेशीर आहे."


दि गुड-वुइल
ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज/मिशन हॉस्पिटल

विमेदारांस
भरपूर सवलती  माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा
हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर

## शेड्यूल्ड बँकांची परिस्थिति

हिंदी शेड्यूल्ड बँकांची ठेवी आणि कर्जे ह्यांचे संबंधानें ताजी परिस्थिति कशी आहे हें खालीं दिलेल्या ताज्यां आकड्यांवरून दिसून येईलः—

| | रुपये | |
|---|---|---|
| | कोटि | लक्ष |
| **बिनमुदत ठेवी** | | |
| (अ) हिंदुस्थान | १६६ | ५५ |
| (ब) ब्रह्मदेश | ८ | ९२ |
| **मुदतबंद ठेवी** | | |
| (अ) हिंदुस्थान | ९७ | ९२ |
| (ब) ब्रह्मदेश | ३ | ७० |
| **रोकड** | | |
| (१) चलनी नोटा | | |
| (अ) हिंदुस्थान | ६ | ४६ |
| (ब) ब्रह्मदेश | | १ |
| (२) ब्रह्मी नोटा | | |
| (अ) हिंदुस्थान | | ·४ |
| (ब) ब्रह्मदेश | | ४६ |
| (३) रुपयांचें नाणें | | |
| (अ) हिंदुस्थान | १ | ४५ |
| (ब) ब्रह्मदेश | | २ |
| (४) किरकोळ नाणें | | |
| (अ) हिंदुस्थान | ० | ३९ |
| (ब) ब्रह्मदेश | | ·५ |
| **रिझर्व्ह बँकेकडे शिल्लक** | ४८ | ४७ |
| **दिलेलीं कर्जें** | | |
| (अ) हिंदुस्थानांत | ९५ | ५८ |
| (ब) ब्रह्मदेशांत | ३ | १९ |
| **डिस्कौंट केलेलीं बिलें** | | |
| (अ) हिंदुस्थान | १ | ८९ |
| (ब) ब्रह्मदेश | | १२ |

---

## ट्रेडमार्कसंबंधीं दावा

मेसर्स मावन सन्स आणि कंपनी (वादी) हे केमिस्टचा धंदा करतात. त्याचप्रमाणें पॉप्युलर रेमिडीज मॅन्युफॅक्चरिंग कंपनी ह्या नांवाखालीं औषधें तयार करण्याचा व विकण्याचाहि धंदा ते करितात. गेलीं ५० वर्षे तें स्किन्स एग्युस्पेसिफिक् ह्या नांवाचें औषध विकीत आहेत, त्याचा घोडा छाप हा ट्रेडमार्क आहे. कोल्हापूर येथील पुरोहित इंडो फार्मसीचे व डॉ. पुरोहित फार्मसीचे डॉ. पुरोहित व इतर प्रतिवादी हे स्वतःचें घोडा छाप ॲग्युमिक्चर स्किन्स एग्युस्पेसिफिकच्या बाटली सारख्या बाटलींतून विकतात असें मेसर्स मावन सन्स लि. ह्या आढळून आलें व त्यांनीं प्रतिवादीवर इंजंक्शन मिळविण्यासाठीं हायकोर्टांत दावा आणला. उभयपक्षांत तडजोड होऊन व प्रतिवादीस त्यांच्या औषधास घोडा छाप नांव देण्यास प्रतिबंध होऊन दावा निकालांत निघाला.

---

## हिंदी चलनी नोटांची परिस्थिति

चलनी नोटांच्या हिशेबाची परिस्थिति कशा प्रकारची आहे हें स्पष्ट डोळ्यांत भरावें म्हणून त्याचा रिझर्व्ह बँकेनें अगदीं अलीकडे प्रसिद्ध केलेला तक्ता आम्ही खालीं देत आहों.

### नोटांचा विभाग

| देणें | रु. |
|---|---|
| नोटा (अ) बँकिंग विभागांतील २७,१७,९५,००० | |
| (ब) व्यवहारांत खेळत्या; हिंदुस्थानांत आणि ब्रह्मदेशांत मिळून २,२९,१४,६८,००० | |
| एकूण देणें | २,५६,३२,६३,००० |

| येणें | रु. |
|---|---|
| (अ) सोनें, नाणीं व पाटले | |
| हिंदुस्थानांत ४४,४१,४३,००० रु. | |
| हिंदुस्थानाबाहेर ............ | |
| पौंडांतले (स्टर्लिंग रोखे) १,३१,५०,११,००० रु. | |
| (अ) ची बेरीज | १७५,९१,५४,००० |
| (ब) रुपये | ३०,७९,३४,००० |
| हिंदुस्थान सरकारचे रोखे | ४९,६१,७५,००० |
| हिंदुस्थानांतल्या हुंड्या व इतर पत–पत्रिका | .............. |
| एकूण येणें | २,५६,३२,६३,००० |


पुण्यांत आल्यावर

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

OUR HOME

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

उतरण्यास या.

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

अवर होम,

११९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

## शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा आणि प्रसिद्ध होणारे कानू

[लेखक—विनायक गणेश तिखे, (ले. शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा कायदा आणि त्याचें विवेचन) ४२ बुधवार, पुणें.]

लोकांनीं या कायद्यासंबंधानें विशेष विचार करण्याची आतां वेळ आली आहे. सरकार या कायद्याची अंमलबजावणी लवकरच सुरू करणार आहे. प्रथम लोकांच्या सूचना मागविण्याकरितां लवकरच कानू प्रसिद्ध होतील. आणि कानूंना अखेरची संमति मिळाली म्हणजे कायदा लवकरच अंमलात आणण्यांत येईल, असें सरकारच्या रेव्हेन्यू सेक्रेटरीकडून नं. ३७९१ एच ३३ ता. १४।११।४० च्या पत्रावरून म्हणावयास हरकत नाहीं.

प्रसिद्ध होणाऱ्या या कानूंकडे सर्व लोकांनीं लक्ष देणें जरूर आहे. लोकांचें लक्ष या गोष्टीकडे वेधण्यासाठीं कोणकोणत्या बाबीसंबंधानें कानू व्हावयाचे आहेत, त्याचें महत्त्व काय आहे, याचा विचार या लेखांत करावयाचा आहे.

हे कानू कायद्याचें कलम ८३ खालीं व्हावयाचे आहेत.१ क.४ प्रमाणें बोर्ड स्थापन झाल्यापासून १८ महिन्यांत अर्ज दाखल करावयाचे आहेत. तेव्हां हे बोर्ड स्थापन झाल्याचें कळलें पाहिजे अशी प्रसिद्धीची रीत कानूनें ठरवावयाची आहे. बोर्डाची खबर सर्वांस सुलभपणें कळेल अशी ही रीत आहे किंवा नाहीं, याचा विचार झाला पाहिजे.

२ क. ४ खालील बोर्डाच्या सभासदांच्या लायक्या आणि असेसर्सच्या लायक्या कानूनें ठरावयाच्या आहेत. हे लोक कोण असतील, त्यांची लायकी काय असेल, वगैरे अनेक प्रश्न अनेक लोक विचारतात. या कायद्याप्रमाणें होणारे निवाडे या लोकांच्या हातांत असल्यामुळें त्यांच्या लायकीसंबंधानें साहजिकच चिंता आणि जिज्ञासा असणारच. ही लायकी आतां लवकरच समजून येईल. त्या वेळीं जागे राहून आणि विचार करून जरूर त्या सूचना सरकारकडे कराव्यात.

३ अर्जाचे नमुने, कर्ज-पत्रकाचे नमुने कानूनें ठरावयाचे आहेत. हे नमुने कायम झाले म्हणजे याप्रमाणें माहिती देणें भाग पडणार आहे. ही माहिती जाचक व्हावयाची आहे किंवा कसें अगर अपुरी आहे, अगर जास्त आहे वगैरे जें कांहीं असेल तें पाहून त्यासंबंधीं योग्य तो विचार झाला पाहिजे.

४ क.३१ प्रमाणें नोटीस बजावणीची रीत. या नोटीशीचें महत्त्व फार आहे. या नोटीशीप्रमाणें कर्ज-पत्रक दाखल झालें नाहीं तर तें कर्ज बुडावयाचें आहे. त्यामुळें या नोटीशीची बजावणी लोकांच्या दृष्टीनें चांगल्या रीतीनें व्हावयास पाहिजे. ही बजावणीची रीत कानूनें ठरवावयाची आहे. तेव्हां या रीतीकडे लोकांनीं लक्ष द्यावें.

५ या कायद्याच्या वेगवेगळ्या कलमाखालीं नोटीसा निघावयाच्या आहेत. या नोटीशीच्या नमुन्याकडे आणि नोटीशीच्या बजावणीकडे लक्ष द्यावें.

६ क.४७ खालीं कलम ३ खालील सावकारास नोटीस व्हावयाची आहे. या नोटीशीच्या नमुन्याकडे आणि नोटीशींतील मुदतीकडे विशेषतः सोसायट्या आणि सहकारी बँका यांनीं अधिक लक्ष द्यावें.

७ क.५० व क.५१ खालीं मिळकतीची किंमत करावयाची रीत कानूनें ठरावयाची आहे. या किंमतीच्या प्रमाणांत कर्ज कमी व्हावयाचें आहे. म्हणून मिळकतीची किंमत वाजवी अशी होईल अशी ही रीत असली पाहिजे. तेव्हां किंमत करण्याच्या या रितीकडे सर्वांनीं लक्ष द्यावें, व परीक्षण करावें. ही रीत योग्य अशी ठरली नाहीं तर त्याचे परिणाम सर्वांस भोगावे लागतील.

८ क.५४ प्रमाणें बोर्डाचा निवाडा व्हावयाचा आहे. या निवाड्यांत कोणकोणत्या बाबी असाव्यात याचा विचार कानूनें व्हावयाचा आहे. या नमुन्यामध्यें अपुरेपणा राहूं नये म्हणून लक्ष द्यावें.

९ क.७८ खालीं व्यक्तींना आणि संस्थांना व्यवहार करण्याचा अधिकार द्यावयाचा आहे. हा अधिकार कोणत्या शर्तीवर द्यावयाचा त्या शर्ती कानूनें ठरावयाच्या आहेत. या शर्तीकडे सहकारी बँकांनीं विशेष लक्ष द्यावें. रकमा गुंतविण्यास एक मोठें साधन या बँकांकरतां उत्पन्न व्हावयाचें आहे. तेव्हां त्यांनीं या शर्तीकडे लक्ष देणें जरूर आहे. त्या योगानें पुढील तजविजीस अडचणी येणार नाहींत.

या कानूसंबंधानें महत्त्वाच्या अशा गोष्टी या लेखांत सांगितलेल्या आहेत. हा कायदा अनेक लोकांवर परिणाम करीत असल्यामुळें या कानूकडे सर्वांनीं लक्ष द्यावें. कानूची उपयुक्तता आणि महत्त्व समजण्यासाठीं मूळ कायदा चांगल्या रितीनें समजला पाहिजे.

कांहीं झालें तरी, कर्जदार असोत, सावकार असोत, त्या सर्वांनीं या प्रसिद्ध होणाऱ्या कानूकडे लक्ष दिलें पाहिजे. ज्यावेळीं प्रत्यक्ष कानू प्रसिद्ध होतील, त्यावेळीं त्यांचें तपशीलवार विवेचन प्रसिद्ध करण्याचा शक्य तों प्रयत्न करूं. परंतु सर्वांनीं काळजीपूर्वक आणि वेळेवर जरूर त्या गोष्टी केल्यास मागाहून पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाहीं. सावधगिरीसाठीं ही पूर्वसूचना दिली आहे.

---


### दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ता:—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A.P.) अमृतसर-Amritsar.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—६ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९४—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—२ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९२—८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९५–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—० |
| ५% म्हेसूर कर्ज ( १९५१–६१ ) ... ... | ११३—० |
| ५% म्हेसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा, वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३६–१२ |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | १०४—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४०—४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५७२—८ |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०४–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३०—८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१३—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६४२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९८—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६०—० |
| अहमदाबाद प्रांतिज ( ५०० ) ११½% | १००१—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ७३५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २११—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४५–१२ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१—३ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३९–१२ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३८००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०८–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४७–१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३१८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. ... | ११०५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | ११८–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( सिंह ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४१-१३-० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ६ –११ |


सर्व तऱ्हेचें कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**' पायोनियर डाइंग हाऊस '**

कोचाचें कापड (Casement cloth) दारांचे पडदे, टेबल कव्हर, इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:— भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

दि

**बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड**

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना

**दि बँक ऑफ इंडिया लि.**

[ स्थापना : १९०६ ]

| | |
|---|---|
| आधिकृत भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१३,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र ऑफिस ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के., के. टी. ( रजेवर ), मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल्. बेराई.

**करंट डिपॉझिट अकाउंटस :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही असेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.


बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट— डी. आर. खाडवाघी.

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हंशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हंशील माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी.

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.



कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचे तेल
आपना ... १०६

डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात.
गळ्याचे बंद होतात व मऊ रहातात.

धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)

तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अतिस्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल
टूथ पावडर

पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**For Collegians**
**Wooden & Iron Furniture**
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**

*Work-Shop Address;*
153 Kasaba.
Poona 2

*Branch No. 1*
Shevak Quarters,
near Fergusson College
Poona 4

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**अर्थशास्त्र**
लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ४००, किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**महायुद्धाची जाणीव!** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ११७।११, पुणें शहर येथें प्रसिद्ध केलें.